जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३९९ दिनांक - २६/०९/२०२४**

युनिट १ गुन्हे शाखा पुणे शहर

# माजी नगरसेवकाच्या खुनाच्या कटात पिस्टल पुरविण्यास मदत करणारा गुन्हे शाखे कडुन जेरबंद

राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज सुर्यकांत आंदेकर यांचा दिनांक ०१/०९/२०२४ रोजी पुर्व वैमनस्यातून पिस्टलमधून गोळ्या झाडुन तसेच कोयत्याने वार करून निर्घुण खुन करण्यात आल्याने समर्थ पोलीस स्टेशन,पुणे येथे गु.र.नं.१८८/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१),६१(२),४९,५४,१०९,१११(१)(i),(२)(३)(४),२३८सह आर्म ॲक्ट कलम ३(२५), ४(२५), सह मपोका कायदा कलम ३७(१)(३)/१३५,सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ७ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(i),३(१)(ii),३(२),३(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी ॲक्ट नुसार कलम वाढ करण्यात आली असून अद्यापर्यंत २१ जणाना अटक व ०२ विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले असून दाखल गुन्ह्याचा तपास चालु असताना अटक आरोपींना पिस्टल पुरविण्यास मदत करणारा इसम आबा खोंड असे असल्याचे तपासामध्ये समोर आल्याने वरिष्ठांनी सुचना देवून आबा खोंड याचा शोध घेवून त्यास तात्काळ ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे युनिट-१ चे अधिकारी व पथक दाखल गुन्ह्यातील पाहीजे आरोपीचा त्याचे नियमीत येण्याजाण्याची ठिकाणे त्याचे प्राप्त पत्त्यावर शोध घेत असताना तो मिळून येत नव्हता.दिनांक २५/०९/२०२४ रोजी पुन्हा त्याचा शोध चालू केला असता गुन्हे शाखा युनिट-१ कडील पोलीस अंमलदार **निलेश साबळे व दत्ता सोनवणे** यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,दाखल गुन्ह्यातील पाहीजे आरोपी आबा खोंड हा त्याचे रहाते परिसरात देशमुखवाडी शिवणे येथे येणार असल्याची बातमी मिळालेने लागलीच गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी सापळा रचुन पाहीजे आरोपी नामे **अभिषेक उर्फ आबा नारायण खोंड वय २४ वर्ष रा.फेज ३ बी,लक्ष्मीगार्डन सोसायटी, देशमुख वाडी शिवणे,पुणे** यास ताब्यात घेवून सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-१, गुन्हे शाखा,पुणे श्री.गणेश इंगळे यांचे समक्ष हजर केले असता आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास या गुन्ह्यात दिनांक २५/०९/२०२४ रोजी रात्रौ.२०/४५ वा.अटक करण्यात आली असून अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.निखील पिंगळे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री.गणेश इंगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनिट ०१, शब्बीर सय्यद पो.उप.निरी अविनाश लोहोटे, सपोफौ.राहुल मखरे, पोलीस अंमलदार दत्ता सोनवणे,निलेश साबळे यांचे पथकाने केली आहे.